दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १८९ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार, दि.१४ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# शेतकऱ्यांना कुठेही वाऱ्यावर सोडणार नाही; सरकार त्यांच्या पाठीशी उभा

## अवकाळीचा फटका बसलेल्यांना एकनाथ शिंदेंचे आश्वासन



शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही ▶ प्रिंटिंग मिस्टेक करणारे हे सरकार नाही ▶ बोगस बियाण्यांवर धाडी टाकून कारवाई

छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)–शेतकऱ्यांना कुठेही वाऱ्यावर सोडणार नाही. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणार आहे, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे. तसेच अवकाळी पावसाच्या नुकसानी संदर्भात सर जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या असून छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी मी स्वतः बोललो आहे, तातडीने पंचनामे होतील, असेही एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे.



### बोगस बियाण्यांवर धाडी टाकून कारवाई

दरम्यान, छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी बोगस बियाण्यांवर धाडी टाकून कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. बोगस बी–बियाणे शहरात येते. त्यावर धाडसत्र दाखवले जाते. मात्र, अपेक्षित म्हणावी तशी कारवाई होत नाही. जे पेरतात त्यांचे होणारे नुकसान होते. त्याची वसुली झाली पाहिजे, असा नियम आहे. त्याचे पालन होत नाही. तसेच, बोगस बियाणे विक्रेत्यांवर कारवाई झालेली दिसत नाही. त्यासंदर्भात प्रशासनाला सक्त सूचना दिल्या. स्कॉड निर्माण करून धाडी टाकण्यास सुरवात करण्याचे सांगितले आहे, असे संजय शिरसाट म्हणाले.

### शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही

सोमवारी चिखली तालुक्यातील इसरूळ येथे जाण्यासाठी एकनाथ शिंदे छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळावर आले होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानावर भाष्य करत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही, असे आश्वासन दिले आहे. तसेच आम्ही निवडणुकीत जे वचननामा दिला, त्यानुसार टप्प्याटप्प्याने पुढे जात आहोत. लाडकी बहीण योजनेसह विकासकामे आपण करत आहोत, असे शिंदे म्हणाले.

### प्रिंटिंग मिस्टेक करणारे हे सरकार नाही

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, प्रिंटिंग मिस्टेक करणारे हे सरकार नाही. आम्ही जे बोलतो, ते करतो. सरकारची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. सगळ्या योजना सुरू ठेवत असताना सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. सरकारला काटकसर करावी लागली. या बजेटमध्ये काही खात्यांना निधी कमी मिळाला. मात्र, पुढच्या जुलै पुरवणी बजेटमध्ये भरून काढू. कुठल्याही खात्यावर अन्याय करण्याची भावना सरकारची नाही, असे ते म्हणाले.

## खुटाळा येथे शंकरपटाच्या आड चालणाऱ्या लाखोंच्या जुगारावर चिमूर पोलिसांची धाड

### वेशांतर करून सहाय्यक पोलीस निरीक्षक निशांत फुलेकर यांची धडक कारवाई; जुगारतस्कर ताब्यात

चिमूर । प्रतिनिधी

चिमूर तालुक्यातील खुटाळा येथे दरवर्षी पारंपरिक पद्धतीने आयोजित होणाऱ्या शंकरपटाच्या आड वर्षानुवर्षे सुरू असलेल्या लाखो रुपयांच्या जुगारावर अखेर चिमूर पोलिसांनी मोठी कारवाई केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक निशांत फुलेकर यांनी वेशांतर करून शंकरपटात थेट हजेरी लावत घटनास्थळी अचानक धाड टाकून जुगाराचे साहित्य व झंडी–मुंडीचे पडदे जप्त केले. या धाडसी कारवाईमुळे जुगारतस्करांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.



खुटाळा येथील ग्रामस्थांकडून पारंपरिक शंकरपट दरवर्षी मोठ्या उत्साहात पार पडते. ही शर्यत म्हणजे बळीराजाचा एक आनंदाचा सण मानला जातो. मात्र गेल्या काही वर्षांपासून या कार्यक्रमाच्या आड काही अपप्रवृत्तींकडून लाखो रुपयांचे जुगार खुलेआम सुरू असल्याची चर्चा होती. यामध्ये झंडी–मुंडी प्रकाराचा समावेश असून, अनेक तरुण शेतकरी या जुगाराच्या विळख्यात अडकले जात होते. या पार्श्वभूमीवर चिमूर पोलीस ठाण्याचे सहा. पो. नि. निशांत फुलेकर यांनी अत्यंत गोपनीयरीत्या सापळा रचला. स्वतः वेशांतर करून शंकरपट स्थळी हजर राहून त्यांनी बारकाईने निरीक्षण केले. त्यावेळी झंडी–मुंडीचे पडदे आणि जुगार चालू असलेले प्रकार उघडकीस आले. तत्काळ कारवाई करत फुलेकर यांनी घटनास्थळी छापा टाकून जुगारात गुंतलेल्या व्यक्तींना ताब्यात घेतले आणि कायदेशीर कारवाई सुरू केली.

या धाडीनंतर खुटाळा परिसरात खळबळ उडाली असून, शंकरपटाच्या नावाखाली चालणाऱ्या या अनधिकृत जुगाराचे नेमके संरक्षण कोण देत होते, याबाबत चर्चा रंगली आहे. ही संपूर्ण प्रकरण पट कमेटीच्या सहकार्याने होत होती की बाहेरून कोणाच्या आशीर्वादाने, यावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, या कारवाईनंतर शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. अनेकांनी या जुगारामुळे बळीराजाच्या सणाचे रूपांतर विनाशात होत असल्याची खंत व्यक्त केली होती. त्यामुळे आता प्रत्यक्ष पोलिसांनी हस्तक्षेप करून योग्य पावले उचलल्याने गावकरी आणि शंकरपटप्रेमींतून समाधान व्यक्त होत आहे.खुटाळ्यात यापुढे शंकरपटाच्या नावाखाली कोणत्याही प्रकारचा जुगार होऊ नये आणि पारंपरिक कार्यक्रमाची शुद्धता जपली जावी, अशी मागणी स्थानिक शेतकरीवर्गाकडून जोर धरत आहे.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत सावडी बुद्रुक येथे मशाल फेरीचे आयोजन




कळमेश्वर । प्रतिनिधी

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन अंतर्गत मौजा सावडी बुद्रुक येथे गावस्तरावरील हवामान अनुकूल आराखडा तयार करण्याच्या शून्य दिवस उपक्रमाअंतर्गत भव्य मशाल फेरीचे आयोजन करण्यात आले.

या फेरीस ग्रामपंचायतीच्या सरपंच कांताबाई घोरमाडे, माजी सरपंच विनायक रावजी पोहकर, इंदिराबाई राऊत यांच्यासह गावातील शेतकरी व महिला शेतकऱ्यांचा मोठा सहभाग लाभला. कार्यक्रमाचे आयोजन कृषी विभागाच्या पुढाकाराने करण्यात आले.सभेमध्ये कृषी अधिकारी बोंद्रे व कृषी सहाय्यक रोशन चौधरी यांनी शेतकऱ्यांना हवामान आधारित शेती पद्धती, पर्यावरणपूरक शेतीचा महत्त्व व नवनवीन कृषी तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले.या वेळी कृषी पर्यवेक्षक महेंद्र सोमकुवर तसेच कृषी विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये हवामान अनुकूल शेतीविषयी जनजागृती होऊन उत्पादनवाढीस चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## गव्हाणीपाडा येथे विजेच्या कडकडाटात दोन म्हशींचा मृत्यू; शेतकऱ्याचे अडीच लाखांचे नुकसान

धुळे । उमाकांत अहिरराव

साक्री तालुक्यात अवकाळी पावसाने थैमान घातले असून, वादळी वाऱ्यासह सतत सुरू असलेल्या विजेच्या कडकडाटामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. गव्हाणीपाडा येथील शेतकरी गांगुर्डे यांच्या गांगेश्वर शिवारातील शेतात बांधलेल्या दोन म्हशींवर सोमवारी दुपारी अचानक वीज कोसळली. या दुर्दैवी घटनेत दोन्ही म्हशी जागीच मृत्युमुखी पडल्या असून, गांगुर्डे कुटुंबावर अडीच लाखांचे मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.



या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, अवकाळी पाऊस आणि विजेच्या तांडवामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मागील काही दिवसांपासून तालुक्यात कांदा, मका, डाळिंब, पपई अशा अनेक पिकांवर अवकाळी पावसाचे आणि वादळी वाऱ्याचे मोठे परिणाम दिसून येत असून, शेतकरी अक्षरशः हतबल झाले आहेत.विजेच्या कडकडाटाने आता फक्त शेतीच नव्हे तर पाळीव जनावरांचाही बळी घेण्यास सुरुवात केली आहे. शेतकरी गांगुर्डे यांच्यावर आधीच कर्जाचे ओझे असताना, या घटनेने त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट ओढवले आहे. प्रशासनाने या घटनेचा पंचनामा करून नोंद घेतली आहे. मात्र, अद्याप कोणतीही आर्थिक मदत मिळालेली नाही.

गांगुर्डे यांनी शासनाकडे तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली असून, आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यातच पाळीव जनावरांच्या मृत्यूमुळे जीवन जगणे कठीण झाले आहे, अशा शब्दांत त्यांनी व्यथा मांडली.तालुक्यात वारंवार होणाऱ्या अशा घटनांनी शेतकऱ्यांचे जीवन अधिकच संकटात सापडले असून, प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करणे गरजेचे ठरत आहे.

## एसटीत लवकरच मेगा नोकरभरती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

नागपूर । प्रतिनिधी

एसटी महामंडळाच्या आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरणासाठी भविष्यात २५ हजार स्वमालकीच्या बसेस घेण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी आपल्याला मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता असेल, याचदृष्टीने चालक, वाहक तसेच अन्य विविध वर्गातील पदांवर भरती प्रक्रिया लवकरच सुरू केली जाणार आहे. या प्रस्तावाला नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली, अशी माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती विचारात घेता, उच्च न्यायालयाने पूर्वीच एसटी महामंडळातील नोकरभरतीवर काही निर्बंध ठेवले होते. तथापि, आगामी काळात निवृत्त होणाऱ्या कर्मचार्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होणार असून, नव्या बसेस चालवण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. त्यानुसार, एसटी महामंडळाने ३०७ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत नव्या नोकरभरतीसाठी ठराव मंजूर केला आहे. एसटीच्या प्रत्येक खात्याने आपल्या विभागातील रिक्त पदांचा फेरआढावा घेऊन आवश्यक पदांसाठी एकत्रित मागणी सादर करावी, असे निर्देश मंत्री सरनाईक यांनी दिले. याशिवाय, एसटीच्या अनेक विभागांमध्ये कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे, विशेषत: बांधकाम विभागात. यासाठी, अभियंते तसेच तांत्रिक अधिकाऱ्यांची भरती प्रक्रिया राबवली जाईल. करार पद्धतीने तसेच सरळसेवा भरतीच्या माध्यमातून रिक्त पदांची भरती केली जाईल.

नव्या बसेसच्या संख्येत वाढ होईल, तसेच कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधात सुधारणा केली जाईल, त्यानुसार पुढील नोकरभरती प्रक्रिया राबविली जाईल. मंत्री प्रताप सरनाईक यांनी या प्रस्तावाच्या मंजुरीसाठी शासनाकडे पाठवले आहे.

# पत्रकार सुरक्षा समितीचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला

## हजारो पत्रकारांची उपस्थिती; समाजातील मान्यवरांचा सन्मान



**माळशिरस । प्रतिनिधी**

पत्रकार सुरक्षा समितीचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा सोलापूर येथील समाज कल्याण केंद्र येथे मोठ्या जल्लोषात आणि उत्साहात पार पडला. राज्यभरातून आलेल्या पत्रकारांनी आणि मान्यवरांनी गर्दी केल्याने संपूर्ण सभागृह खचाखच भरले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार सुरक्षा समितीचे प्रदेशाध्यक्ष यशवंत पवार होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी पत्रकार संरक्षणासाठी समिती गेल्या आठ वर्षांपासून करत असलेल्या संघर्षाचा आढावा घेतला. प्रभावी पत्रकार संरक्षण कायदा, ज्येष्ठ पत्रकारांना समान पेन्शन, आरोग्य व विमा योजना, साप्ताहिक वृत्तपत्रांना जाहिराती, युट्युब व पोर्टल पत्रकारांना शासकीय मान्यता, तसेच ग्रामीण पत्रकारांना एसटी बसमधून मोफत प्रवास मिळावा, या मुद्द्यांसाठी समिती सातत्याने आंदोलन, निवेदन आणि शासनाशी पत्रव्यवहार करत असल्याचे त्यांनी नमूद केले. पत्रकारांचे प्रश्न सुटल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी यावेळी मांडली.

या पुरस्कार सोहळ्यात समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकार, वकिल, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, कृषीसेवक, रक्तपेढी आणि इतर क्षेत्रातील मान्यवरांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी आदर्श पत्रकार, आदर्श वकील, कृषीरत्न, आदर्श ग्रामपंचायत सेवक, रेशीम रत्न, आदर्श कुटुंब प्रमुख, यशस्वी उद्योजक, आदर्श समाजसेवक आणि आदर्श रक्तपेढी या विविध गटांतील पुरस्कारप्राप्त व्यक्तींना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. सोलापूर जिल्ह्यातील विविध भागांतील मान्यवरांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून त्यास भव्य स्वरूप दिले.या वेळी माजी सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण कदम, मुंबई उच्च न्यायालयातील वकील संजीव सदाफुले, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी मीनाक्षीताई पेठे, प्रा. डॉ. अजय दासरी, शिवसेना जिल्हाप्रमुख रामचंद्र सरवदे, कार्यकारी प्रदेशाध्यक्ष मिर्झा गालिब मुजावर, पत्रकार सुरक्षा समितीचे सोलापूर शहराध्यक्ष आन्सर तांबोळी, प्रसिद्ध कुष्ठरोग तज्ज्ञ डॉ. यु. एफ. जानराव, संपादक डॉ. कीर्तीपाल गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रमहर्षी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचा आणि पुरस्कारप्राप्तांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुंदर व प्रभावी सूत्रसंचालन पत्रकार सिद्धार्थ भडकुंबे यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा संघटक सादिक शेख यांनी मानले.कार्यक्रमास सोलापूर व अन्य जिल्ह्यातील पत्रकार, संपादक, सामाजिक कार्यकर्ते, युट्युब व पोर्टल प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सोहळा शिस्तबद्ध, प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक वातावरणात पार पडला. पत्रकार सुरक्षा समितीच्या उपक्रमास राज्यभरातून मिळणारा प्रतिसाद हा समितीच्या सामाजिक बांधिलकीचा ठसा असून, यामुळे पत्रकारांच्या हक्कांसाठी चाललेला लढा अधिक प्रभावी होत असल्याचे या सोहळ्याच्या यशावरून स्पष्ट झाले.

### तळोधी बसस्थानकावर विभागीय अधिकाऱ्यांची पाहणी

## सुविधा अपुऱ्या,अतिक्रमणामुळे बस रस्त्या वरच; तातडीने उपाययोजनेची मागणी




**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे ५ मे ते १५ मे २०२५ या कालावधीत संपूर्ण राज्यात बसस्थानक सर्वेक्षण मोहीम राबवली जात आहे. या पार्श्वभूमीवर ८ मे रोजी दुपारी चार वाजता तळोधी (बा.) येथील एसटी बसस्थानकाला विभागीय वाहतूक अधीक्षक गोविंद उजवणे यांनी भेट दिली.या दौऱ्यात बसस्थानकात प्रवाशांसाठी उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचा सखोल आढावा घेण्यात आला. स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वाहक-चालकांसाठी विश्रांतीगृह, प्रसाधनगृहांची स्थिती, लाईट आणि पंख्यांची सोय, बसस्थानकाची रंगरंगोटी, तसेच बसस्थानक परिसरातील वृक्षारोपणाचा अभाव याकडे पाहणी पथकाचे लक्ष वेधले गेले.

विशेष म्हणजे बसस्थानक परिसरातील अतिक्रमण ही गंभीर समस्या असून त्याच्या परिणामी एसटी बसेस थेट स्थानकात न येता मुख्य रस्त्यावरच थांबवल्या जात आहेत. यामुळे प्रवाशांना आणि चालक-वाहकांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.या पाहणीवेळी विभागीय कर्मचारी राजू करपते, वाहतूक निरीक्षक मनोहर कामडी, पत्रकार गोकुळ पाकमोडे, सीटीव्ही पत्रकार परिमल मदनकर आणि प्रवासी प्रतिनिधी विलास मदनकर उपस्थित होते.स्थानकाच्या पाहणीदरम्यान पत्रकार बांधवांनी अधिकाऱ्यांसमोर विविध समस्या मांडल्या. विशेषतः पिण्याच्या पाण्याचा अभाव, अस्वच्छता, अपुरे सौंदर्यीकरण आणि अतिक्रमण याबाबत लवकरात लवकर ठोस उपाययोजना राबवण्यात याव्यात, अशी ठाम मागणी करण्यात आली.

## पोटेगाव येथे वीज पडून गाय ठार;संगोबा येथे वीजेचा दणका




**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील पोटेगाव येथे वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले. दि. १२ मे रोजी दुपारी सुमारास वीज पडून पोटेगाव येथील शेतकरी दत्तात्रय भीमराव भागडे यांची दुभती जर्सी गाय मृत्युमुखी पडली. अंदाजे सत्तर ते पंच्याहत्तर हजार रुपयांची आर्थिक हानी झाल्याचे सांगण्यात येत आहे.

अचानक आलेल्या पावसामुळे वातावरणात गडगडाट आणि विजांचा कडकडाट सुरू होता. या दरम्यान गाईवर वीज पडल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने भागडे दाम्पत्याला अश्रू अनावर झाले असून, शेतकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.घटनेची माहिती मिळताच पशुधन विकास अधिकारी डॉ. हेमंत अनारसे यांनी घटनास्थळी भेट देत तातडीने पंचनामा केला आणि अहवाल तयार केला. तसेच तलाठी विवेक चिंतामणी, सोमनाथ खराडे आणि ड. शशिकांत नरुटे यांनीही याची नोंद घेत तहसीलदार कार्यालयाला माहिती सादर केली आहे.दरम्यान, याच दिवशी संगोबा परिसरातही वीज पडल्याची नोंद झाली असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, पावसामुळे शेतातील उभ्या पिकांचे नुकसान झाल्याची माहितीही समोर आली आहे.गावातील नागरिकांनी प्रशासनाकडून तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

## जगाला युद्ध नको, बुद्ध हवाच्या जयघोषाने निनादला मालेवाडा



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील मालेवाडा येथील जेतवन बुद्ध विहाराच्या वतीने बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि शांततेच्या जयघोषात साजरी करण्यात आली. जगाला युद्ध नको, बुद्ध हवा या घोषणांनी संपूर्ण गावात शांततेचा संदेश निनादला.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान गौतम बुद्ध आणि बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर विहारापासून गावातील मुख्य रस्त्याने हातात मेणबत्त्या आणि बुद्ध मूर्ती घेऊन शांततेची मिरवणूक काढण्यात आली. जयभीम आणि बुद्ध वंदनेच्या घोषणांनी वातावरण भारले गेले.ही मिरवणूक सुगतकुटी येथे जाऊन संपन्न झाली, जिथे बोधिवृक्षाला व महामानवांना अभिवादन करून बुद्धवंदना करण्यात आली. यानंतर आदरणीय भन्ते बोधीपालो यांनी उपासक-उपासिकांना करुणा, समता व विज्ञानवादी जीवनदृष्टी यांवर मार्गदर्शन केले.या त्रिवेणी मंगलमय प्रसंगी गावात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण होते. अखेरीस खीरदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाला समस्त बौद्ध अनुयायी, ग्रामस्थ व बुद्धप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेवेसाठी व्रतस्थ व्यक्तिमत्त्व म्हणजेच विवेक बोढे-आमदार देवराव भोंगळे

### वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम, शेकडो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग



**घुग्घुस । प्रतिनिधी**

भाजपचे जिल्हा महामंत्री आणि सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले रुग्णसेवक विवेक बोढे यांचा वाढदिवस ११ मे रोजी शहरात उत्साहात साजरा करण्यात आला. केवळ औपचारिक सोहळ्यापुरता मर्यादित न राहता, या दिवशी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

सकाळपासूनच शुभेच्छुकांनी त्यांच्या निवासस्थानी गर्दी केली होती. अनेक प्रभागांमध्ये केक कापून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. ऑटो व डग्गा संघटनेने बसस्थानक चौकात केक कापून शीतपेय वाटप केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ घुग्घुसतर्फे पत्रकार कार्यालयात पत्रकार बांधवांनी वाढदिवस साजरा करत पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. सायंकाळी प्रयास सभागृहात भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार देवराव भोंगळे म्हणाले, विवेक बोढे हे केवळ रुग्णसेवक नाहीत तर सेवेसाठी व्रतस्थ व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी अनेक अपघातग्रस्तांचे प्राण वाचवले असून, आर्थिक मदतीपासून ते कंपन्यांतून भरपाई मिळवून देण्यापर्यंत त्यांचा मोलाचा वाटा आहे. जलसेवेसह वैद्यकीय मदतीच्या माध्यमातून त्यांनी घुग्घुसच्या जनतेसाठी अतुलनीय कार्य केले आहे. या वेळी बोढे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणात विवेक बोढे यांनी सर्वांचे आभार मानले व पुढेही समाजासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प व्यक्त केला. हरिश शर्मा (भाजप जिल्हाध्यक्ष), राहुल पावडे, महेश देवकते, विनोद चौकरी, सुरेंद्र भोंगळे, अमोल थेरे, अर्चना भोंगळे, किरण बोढे, नितु चौधरी, किरण बांदूरकर, प्रमोद भोस्कर, इर्शाद कुरेशी, वसंता भोंगळे, नितीन काळे, असगर खान, रत्नेश सिंग, तुलसीदास ढवस, विवेक तिवारी, सचिन कोंडावार, पूनम दुर्गम आदींसह शेकडो कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## नागभीड तालुक्यात उन्हाळी धानपिक नुकसानीच्या पंचनाम्यांना सुरूवात

### चिंधीचक व उश्राळमेंढ्याला गारपिटीचा मोठा तडाखा; १३८ गावांतील सर्वेक्षण सुरू



**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यात १ ते ४ मे या कालावधीत वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या उन्हाळी धानपिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त भागांत पंचनाम्यांना बुधवारी अधिकृत सुरुवात झाली आहे.

१ मे रोजी रात्री आठच्या सुमारास झालेल्या गारपिटीने चिंधीचक, उश्राळमेंढा, गंगासागर हेटी, आकारपूर, सावर्ला, लखमापूर, खरकाडा, आलेवाही आदी गावांतील शेतशिवारांतील उभे धानपिक अक्षरशः जमिनदोस्त झाले. बांधांमध्ये धानाचा सडा पडला असून, अनेक भागांत ८० ते ९० टक्क्यांपर्यंत नुकसान झाल्याचे प्रत्यक्ष पाहणीदरम्यान स्पष्ट झाले. त्यानंतर ३ मे रोजी पुन्हा आलेल्या गारपिटीने उरलेसुरले पिकही उद्ध्वस्त केले.

या भीषण नुकसानीमुळे शेकडो शेतकरी सोमवारी नागभीड तहसील कार्यालयावर धडकले. त्यांनी तहसीलदार प्रतापराव वाघमारे यांची भेट घेऊन तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी केली. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेता तहसीलदार वाघमारे यांनी तत्काळ लेखी आदेश काढून सर्व १३८ गावांमध्ये तलाठी, कृषी सहायक व ग्रामसेवकांची नियुक्ती केली.पंचनाम्याच्या कार्यास गती मिळावी यासाठी महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना तपासणी व समन्वय अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांचीदेखील मदत घेतली जात आहे. या सर्वेक्षणात कोणताही हलगर्जीपणा होऊ नये, असे स्पष्ट निर्देश तहसीलदार वाघमारे यांनी दिले आहेत.

### गारपिटीचा सर्वाधिक फटका चिंधीचक व उश्राळमेंढ्याला

**चिंधीचक व उश्राळमेंढा शेतशिवारात गारपिटीचा जबरदस्त तडाखा बसल्याने तेथील शेतकरी अक्षरशः उध्वस्त झाले आहेत. अनेकांनी कर्ज काढून पेरलेली पिकं दोन दिवसांच्या हवामानाच्या बदलाने हातातून गेली. आता पावसाळी हंगामात नव्याने पेरणी करायची तर आर्थिक स्रोत शिल्लक नाहीत, अशा परिस्थितीत शेतकरी मोठ्या मानसिक तणावात आहे.या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने नुकसान भरपाई जाहीर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून जोर धरू लागली आहे.**

## मूल पोलिस स्टेशनचे नवीन ठिकाणी स्थलांतर



**मूल । प्रतिनिधी**

मूल शहरातील बाजार चौकात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले मूल पोलिस स्टेशन आता स्थलांतरित करण्यात आले आहे. पूर्वी महाराष्ट्र बँकसमोरील ब्रिटिश कालीन इमारतीत हे पोलिस स्टेशन कार्यरत होते. मात्र, सदर जुन्या इमारतीचे रूपांतर एका नव्या प्रशासकीय संकुलात करण्याच्या उद्देशाने ती इमारत पाडण्यात येणार असून, त्याअंतर्गत पोलिस स्टेशनचे स्थलांतर करण्यात आले आहे.नवीन पोलिस स्टेशन सध्या न्यायालयाच्या इमारतीच्या मागे, जुन्या सिंचाई विभागाच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे. पोलिस स्टेशनकडे जाण्यासाठी उपविभागीय पोलिस अधिकारी, मुल यांच्या कार्यालयाच्या बाजूने, जुन्या पटवारी कार्यालयासमोरील रस्त्याने प्रवेश करता येईल.शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे. तसेच, नव्या कार्यालयाचा पत्ता समजत नसल्यास ०७१७४ २२०२२७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

# सीआरपीएफ बटालियनमध्ये सेवेत असलेल्या सुरज अंबादास बावणे यांच्या निधनामुळे पुलगावमध्ये शोककळा

**पुलगाव । प्रतिनिधी**
येथील तेलघानी फैल परिसरातील रहिवासी सुरज अंबादास बावणे हे मागील ८ वर्षांपासून केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) मध्ये कार्यरत होते. सध्या ते मणिपूर येथे सेवेत होते. काही दिवसांच्या सुट्टीवर ते आपल्या पैतृक गावी, पुलगाव येथे आले होते. मात्र, भारत-पाकिस्तान यांच्यात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे सर्व जवानांच्या रजा रद्द करण्यात आल्या. त्यामुळे सुरज पुन्हा मणिपूरला सेवेसाठी रवाना झाले.मणिपूरमधील मुख्यालयापासून सुमारे ४० किलोमीटर दूर असलेल्या एका कार्यालयात कागदपत्रे घेऊन ते गेले होते. कामानंतर रात्र झाल्याने त्यांनी जवळच्या लॉजमध्ये मुक्काम केला. तिथेच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यात त्यांचे दुःखद निधन झाले.ही बातमी समजताच संपूर्ण पुलगाव शहरात शोककळा पसरली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक लहान मुलगा, आई-वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे.त्यांच्या पार्थिवावर तेलघानी फैल येथून ट्रकवर सजवलेल्या रथाद्वारे अंत्ययात्रा काढण्यात आली. हजारो पुलगावकर नागरिकांनी उपस्थित राहून सुरज बावणे यांना श्रद्धांजली अर्पण केली. स्थानिक मोक्षधाम येथे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.






# ग्रामीण भागातून IIM नागपूरची शिखर यात्रा;विश्वास कांबळेंचा प्रेरणादायी यशप्रवास


**पिंपळगाव (लुटे) । प्रतिनिधी**
येथील ग्रामीण भागातून पुढे येत विश्वास मोरेश्वरराव कांबळे यांनी नागपूर खखच् मधून चइ- पदवी प्राप्त करून आपल्या कुटुंबासह संपूर्ण परिसराचे नाव उज्वल केले आहे. दिनांक ११ मे २०२५ रोजी खखच् नागपूर येथे पार पडलेल्या नवव्या दीक्षांत समारंभात त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली.त्यांच्या या यशामुळे सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. विश्वास कांबळे हे माजी जिल्हा परिषद सदस्य इंदुताई कांबळे यांचे चिरंजीव असून, हे यश त्यांच्या कुटुंबासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरले आहे.




या प्रवासात डॉ. उज्वला कांबळे (भीतकर), डॉ. प्रवीण कांबळे, स्वाती कांबळे, डॉ. रॉली कांबळे आणि सिद्धांत भीतकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.आपल्या यशाचे श्रेय ते आई-वडिलांप्रमाणेच आपल्या पत्नीला देतात. त्याचबरोबर, स्वतःची जिद्द, मेहनत आणि चिकाटी यांच्यामुळेच हे यश शक्य झाले, असे त्यांनी नमूद केले.ग्रामीण भागातील तरुणांसाठी विश्वास कांबळे हे एक प्रेरणास्थान ठरत आहेत.

# इंडियन मिलिटरी स्कूलचा १००% निकाल हर्षद गुल्हाने प्रथम, मृणाल हातागरे द्वितीय

**पुलगाव । प्रतिनिधी**
येथील इंडियन मिलिटरी स्कूलने यंदा इयत्ता दहावीच्या परीक्षेत १००% निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. शाळेतील हर्षद गुल्हाने याने ९२.६०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर मृणाल हातागरे याने ९२.२०% गुणांसह द्वितीय स्थान मिळवले. कृष्णा कांबडी आणि सक्षम ठवरे या दोघांनी ९०.४०% गुण मिळवून संयुक्तरित्या तृतीय क्रमांक मिळवला.
यंदा एकूण ७८ विद्यार्थी परीक्षेला बसले






होते. त्यापैकी ४ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले, २४ विद्यार्थ्यांनी ७५% ते ८९% गुण, ३२ विद्यार्थ्यांनी ६०% ते ७४% गुण मिळवले, तर उर्वरित विद्यार्थ्यांचे गुण ६०% पेक्षा कमी होते.

या घवघवीत यशाबद्दल शाळेचे संचालक कृष्णा कडू, प्राचार्य रविकिरण भोजने आणि उपप्राचार्य नितीन कोठे यांनी विद्यार्थ्यांचे, पालकांचे आणि शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# केंद्रीय विद्यालय पुलगाव कॅम्पचा दहावी व बारावी सीबीएसई परीक्षेत भरघोस यश; विभा दर्डा ९७.४% गुणांसह शाळेत प्रथम

**पुलगाव । प्रतिनिधी**
केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (उइडए) इयत्ता दहावी व बारावीचा निकाल १३ मे रोजी जाहीर झाला असून केंद्रीय विद्यालय, पुलगाव कॅम्पच्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. दहावीच्या परीक्षेसाठी शाळेतील एकूण ६६ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी ९ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले.
दहावीमध्ये विभा दर्डा हिने ९७.४% गुणांसह शाळेत प्रथम क्रमांक मिळवला. तिच्या पाठोपाठ अरवा बोहरा हिने




९६.२% गुणांसह दुसरा क्रमांक पटकावला. तसेच शर्वरी सुरकर, रितेश साहू आणि प्रांजल माटे यांनीही ९५% गुण मिळवून शाळेचा गौरव वाढवला.




बारावीच्या परीक्षेत एकूण १९ विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये गोरांग ढोबळे याने ८३.४% गुणांसह प्रथम क्रमांक, प्रिया जयस्वाल हिने ८१% गुणांसह दुसरा क्रमांक, तर अमन आर्य याने ७७.८% गुण मिळवत तिसरा क्रमांक मिळवला. बारावीतील ३ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा जास्त गुण मिळवले.या घवघवीत यशाबद्दल सीएडी कॅम्प ब्रिगेडियर व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कौशलेश पांघाल, प्राचार्य सुनील परदेशी, तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशामध्ये योगदान देणाऱ्या शिक्षक, पालक आणि शालेय कर्मचारी वर्गाचे विशेष कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# इतर मागास बहुजन कल्याण विभागाची परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

## अर्ज करण्याची अंतिम मुदत १७ मे पर्यंत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी क्यूएस रँकिंग (जगभरातील २०० च्या आत विद्यापीठांची क्रमवारी) अंतर्गत परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये सन २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या ७५ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी शाखानिहाय, अभ्यासक्रमनिहाय जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.इच्छुक विद्यार्थ्यांनी www. obcbahujankalyan. maharashtra.gov.in qH$dm https://.obcbahujankalyan. maharashtra. gov.in या संकेतस्थळावरून अर्ज डाऊनलोड करावा तसेच परिपूर्ण व आवश्यक कागदपत्रासह १७ मे २०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत सक्षम किंवा पोस्टाने संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे येथे दोन प्रतित सादर करावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहायक संचालक आशा कवाडे यांनी केले आहे.

# गुरुकुल विद्यानिकेतन हायस्कूल चा निकाल १०० % टक्के

## सलग १५ व्या वर्षी निकाल १०० प्रतिशत शाळेचा सक्षम लोखंडे शाळेतून प्रथम







**देवळी । प्रतिनिधी**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या
माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत गुरुकुल विद्यानिकेतन हायस्कूल, देवळी येथील इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा निकाल १०० प्रतिशत लागला असून शाळेतील सर्वच विद्यार्थी उत्कृष्ट गुणांसह उत्तीर्ण झाले. या उज्वल यशामध्ये सक्षम अरविंद लोखंडे हा ८७.८०% गुण मिळवून शाळेतून प्रथम आला आहे.तसेच शाळेतून कु भार्गवी कृष्णाजी पिंपळे ही ८६.२० % गुण मिळवून द्वितीय,कु. हिमानी पवन देशमुख ८६.००% गुण मिळवून तृतीय, आतिश रत्नाकर तुरक ८४.४०% गुण मिळवून चतुर्थ, व पारस सुभाष सुरकार याने ८३.६०% मिळवून पाचवा क्रमांक प्राप्त केला आहे.
यावर्षी एकूण ३१ मुले प्रविष्ट होती. त्यापैकी १५ विद्यार्थी प्राविण्यश्रेणीत व १३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.
सलग पंधराव्या वर्षी शाळेचा निकाल शंभर टक्के लागला असून या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, मुख्याध्यापक योगेश ढोरे व शिक्षकांना देतात.

# भारत विद्यालयाची उज्वल निकालाची परंपरा कायम शालांत परीक्षा मार्च २०२५ चा निकाल-९४.७४ टक्के

**हिंगणघाट । प्रतिनिधी**
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित भारत विद्यालयाने दहावीच्या शालांत परीक्षेतील यंदाचा ९४.७४% निकाल लागवून आपली उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. शाळेतील संघर्ष मंगेश येरणे याने ९४.८०% गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. त्याचबरोबर मेघना धनराज नहार हिने ९३.६०% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर वेदिका विनोद तेलहांडे हिने ९३% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.
या यशामध्ये सिद्धी अजय तिवारी (९१.२०%), अनुष्का धर्मराज लोणकर (९१%), खुशी संजय ठक (९१%), भूमिका गजानन महाजन (८९.४०%), तन्वी सुभाष सोनवणे (८८.८०%), ओम धनराज खडसे (८८.६०%), रुचिका सुनील अवचट (८८.२०%), व ओंकार आनंद बनसोड (८८%) यांसारख्या विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणीतील कामगिरी केली आहे.शाळेतील एकूण ३२२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, यापैकी ३०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये ६७ विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणी, १०१ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, १०४ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी, तर ३३ विद्यार्थ्यांनी पास श्रेणी प्राप्त केली आहे.या यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गोकुलदास राठी, सचिव रमेशजी धारकर, उपाध्यक्ष श्यामभाऊ भिमणवार, तसेच सर्व संचालक सदस्य, मुख्याध्यापक हरीश भट्टड, उपमुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका निलांक्षी बुरीले, शिक्षिका मनिषा कोंडावार, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले असून विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.














# मारिया इंग्लिश स्कूल, देवळीचा एसएससी बोर्ड मध्ये १००% निकाल; अनुष्का कदम प्रथम




**देवळी । प्रतिनिधी**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेत मारिया इंग्लिश स्कूल, देवळीने यंदाचा परंपरागत १००% निकाल कायम ठेवला. या परीक्षेत एकूण सर्व विद्यार्थ्यांनी उत्तीर्णता मिळवली. शाळेतील अनुष्का कदम हिने ९१% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, तर मनस्वी ठाकरे याने ७८% गुणांसह द्वितीय आणि संजय गदई यांनी ६५.४०% गुण मिळवत तृतीय स्थान प्राप्त केले. याव्यतिरिक्त नबेला शेख (६३.४०%) आणि नयन जोगे (६३%) यांनी शाळेचा गौरव वाढविला.
मारिया इंग्लिश स्कूलच्या या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे सचिव अब्दुल रहमान तवर, रिजवान तवर, मुख्याध्यापिका अनिता मून, तसेच शिक्षक अनुप झाडे, शुभांगी डफरे, काजल देशमुख व मोनाली मदनकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या.

# गौतम बुद्ध जयंतीनिमित्त भारतीय संविधानाच्या मराठी प्रतींचे वाटप

## बाबासाहेब आंबेडकर मित्रपरिवाराचा उपक्रम उल्लेखनीय

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**
महाकारुणिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मित्रपरिवाराच्या वतीने भारतीय संविधानाच्या मराठी आवृत्तीच्या ५० प्रतींचे वाटप करण्यात आले. हे वितरण पंचशील बुद्ध विहार व सिद्धार्थ बुद्ध विहार, सिंदी येथे संपन्न झाले.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनकार्याच्या माध्यमातून ईहवाद, विज्ञाननिष्ठा आणि मानवतावाद या मूल्यमान्य तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवून दिलेल्या २२ प्रतिज्ञा या केवळ घोषवाक्य नसून, त्या भगवान बुद्धांच्या धम्माचे सार आहेत. या प्रतिज्ञा म्हणजेच मानवी जीवनातील दीपस्तंभ असून, समाजातील अंधश्रद्धा, रूढी-परंपरांना नाकारून प्रज्ञेच्या



प्रकाशाकडे, निर्वाणाच्या दिशेने वाटचाल करणारा मार्ग आहे.या उपक्रमाच्या माध्यमातून संविधान आणि बुद्धधम्माचे सामाजिक महत्व लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले गेले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर महिला आणि पुरुषांची उपस्थिती होती. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात मनीष कुंभारे, अमित सातपुते, गोपाल गवई, प्रियंका भगत, कविता सातपुते, प्रफुल भगत, सचिन मेंढे आदींचे मोलाचे योगदान लाभले.संविधानाच्या या प्रती विहारांमध्ये कायमस्वरूपी वाचनासाठी उपलब्ध असतील. नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीमार्फत करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन मेंढे यांनी केले.

# गोरगरीब, शेतकरी व आदिवासींसाठी 'लाल बावटा'चा संघर्ष मोर्चा यशस्वी

## डहाणू पंचायत समितीकडून लेखी आश्वासन; शिस्तबद्ध आंदोलनात हजारोंचा सहभाग

**पालघर । प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील गोरगरीब, शेतकरी व आदिवासी समाजाला भेडसावत असलेल्या मूलभूत समस्यांच्या विरोधात भारताचा मार्क्सवादी लेनिनवादी पक्ष (लाल बावटा) यांच्या वतीने दिनांक १३ मे २०२५ रोजी डहाणू येथे भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात तालुक्याभरातून मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला असून, सुमारे ३००० हून अधिक आंदोलकांनी आपल्या मागण्यांसाठी प्रशासनाला जागं केलं.





डहाणू तालुक्यातील अनेक गावांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. शासकीय योजनांअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या 'शुद्ध पाणी योजना' वर्षानुवर्षे अपूर्ण अवस्थेत आहेत. सार्वजनिक वितरण प्रणालीत (राशन) अनियमितता असून अनेक गरजूंना शिधापत्रिकाच मिळालेली नाही. तसेच, काही भागांत बेकायदेशीर दारूविक्री बिनधास्त सुरू आहे, त्यामुळे आरोग्य व सामाजिक शिस्त धोक्यात आली आहे. या सगळ्या प्रश्नांवर आंदोलकांनी ठामपणे आवाज उठवला.

तालुक्यातील आदिवासी व दुर्गम भागांतील आरोग्य आणि शिक्षण सुविधांची वानवा ही देखील आंदोलनाची मुख्य मागणी होती. अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे अपुरी सुविधा व कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे बंद अवस्थेत आहेत. विद्यार्थ्यांना शाळांमध्ये पुरेशी साधनसामग्री व शिक्षक उपलब्ध नाहीत. या सर्व प्रश्नांसह शासकीय जमिनींचे वाटप वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचा मुद्दा आंदोलकांनी उचलून धरला.

मोर्चाची सुरुवात सकाळी करण्यात आली. ठिकठिकाणाहून आलेले आंदोलक डहाणू शहरात एकवटले. घोषणा, फलक, व निषेधाचे बॅनर घेत शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चा डहाणू पंचायत समिती कार्यालयावर नेण्यात आला. यावेळी 'शुद्ध पाणी आमचा हक्क आहे', 'दारूबंदी लागू करा', 'शासकीय योजना सर्वांसाठी' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.मोर्चाच्या प्रतिनिधींनी पंचायत समितीचे अधिकारी व प्रशासनाशी चर्चा करून सर्व मागण्यांचे निवेदन सादर केले. यावर प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद देत लेखी स्वरूपात आश्वासन देण्यात आलं की, सर्व मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल. यानंतर आंदोलनाची शांततेत सांगता करण्यात आली.या यशस्वी मोर्चामध्ये भारताचा मार्क्सवादी लेनिनवादी पक्षाचे डहाणू तालुक्यातील नेतृत्व सक्रियपणे सहभागी झालं. सुभाष लहांगे, बापू वाघ (तालुका अध्यक्ष), दिलीप चव्हाण (गट प्रमुख), तसेच अनेक स्थानिक कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी मोर्चाच्या आयोजनात मोलाची भूमिका बजावली. विविध गावांतील आंदोलकांना एकत्र आणून, त्यांच्या मागण्या ठामपणे प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचं आव्हान त्यांनी समर्थपणे पार पाडलं.आजच्या काळात रस्त्यावर आंदोलन करताना हिंसाचार व गोंधळ दिसून येतो. मात्र 'लाल बावटा'च्या नेतृत्वाखालील हा मोर्चा अत्यंत शिस्तबद्ध आणि शांततेत पार पडल्याने स्थानिक नागरिकांतून समाधान व्यक्त केलं जात आहे. पोलिस बंदोबस्त असूनही कोणतीही अनुचित घटना घडली नाही.

# ज्ञानविकास विद्यालयाचा गणेश मरमट सेमी इंग्रजीतून ९६.२० टक्के गुणांसह प्रथम

## शंभर टक्के निकालाची परंपरा कायम; यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**पिशोर । जावेद शेख**

भराडी येथील अशोकदादा गरुड संचलित ज्ञानविकास विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल यंदाही १०० टक्के लागून गुणवत्तेची परंपरा कायम राखण्यात शाळेला यश आले आहे. विशेष म्हणजे, सेमी इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या गणेश अनिल मरमट या विद्यार्थ्याने ९६.२० टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच्या यशामध्ये घरातील प्रोत्साहनाबरोबरच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळेच्या सर्वांगीण अभ्यासपद्धतीचा मोठा वाटा असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.



गणेश मरमटनंतर पायल आग्रे हिने ९२.६० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला, तर कल्याणी साखरेने ९२.२० टक्क्यांसह तृतीय क्रमांक मिळवला. यंदा देखील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय निकालासह शाळेची शान वाढवली आहे. शाळेतील ०५ विद्यार्थी -१ श्रेणीत, १६ विद्यार्थी -२ श्रेणीत, २८ विद्यार्थी इ१ श्रेणीत, २७ विद्यार्थी इ२ श्रेणीत आणि १९ विद्यार्थी उ१ श्रेणीत उत्तीर्ण झाले. सर्वच विद्यार्थ्यांनी अपार मेहनतीने उत्तम यश संपादन केले.


या घवघवीत यशानंतर शाळेचे संचालक अशोकदादा गरुड, शिल्पा गरुड यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व वाहनचालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पालक, ग्रामस्थ आणि माजी विद्यार्थी यांनी देखील विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव केला.

या यशस्वी निकालानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य संचारले असून, शाळेच्या शंभर टक्के निकालाच्या परंपरेत यंदाही भर पडल्यामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षक व पालकांच्या एकत्रित प्रयत्नातून मिळालेले हे यश ज्ञानविकास विद्यालयासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# दादासाहेब पाटील पब्लिक स्कूलने शंभर टक्के निकालासह शाळेची गौरवशाली परंपरा कायम ठेवली

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, दहेगाव येथील कै. दादासाहेब पाटील पब्लिक स्कूलने यंदाही आपल्या १०० टक्के निकालाची गौरवशाली परंपरा कायम ठेवली आहे. दरवर्षीप्रमाणे शाळेने याही वर्षी सर्व विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करत गुणवत्तेचा आदर्श प्रस्तुत केला आहे. या वर्षीच्या परीक्षेमध्ये उगले अभिषेक ज्ञानेश्वर याने ९२.८० टक्के गुण प्राप्त करत शाळेतील प्रथम क्रमांक पटकावला. वाघ समीक्षा काकासाहेब हिने ९१.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर जाधव जान्हवी अरुण हिने ९०.४० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाने आणि समर्पणाने शाळेच्या यशाला आणखी उज्ज्वल केले आहे.या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत संस्थेचे सचिव काकासाहेब रामकृष्ण पाटील, संचालिकासुहासिनी काकासाहेब पाटील, व्यवस्थापकीय संचालक पुष्कर भैय्या पाटील, प्राचार्य एम. एन. शेख , उपप्राचार्य गौतम सोनवणे , मॅनेजर विष्णु बरबडे आणि सर्व शिक्षकवर्गाने त्यांचे कौतुक केले. शाळेच्या १००% यशाच्या परंपरेला आणखी एक पाऊल पुढे नेत, या विद्यार्थ्यांच्या कष्ट आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे शाळेने एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे. भविष्यातही या विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबाचे, शाळेचे आणि गावाचे नाव गौरविले, अशी शुभेच्छा सर्व उपस्थितांनी दिली.शाळेने गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शिस्तीचा आदर्श निर्माण केला आहे, आणि हे यश शाळेच्या शंभर टक्के निकालाच्या परंपरेचा एक भाग बनले आहे.




# रासपच्या स्वराज महा रॅलीचे कोल्हार भगवतीपूर येथे जल्लोषात स्वागत



**कोल्हार । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने माजी मंत्री महादेव जानकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित 'स्वराज महा रॅली'चे मंगळवारी सकाळी ठीक १०.३० वाजता कोल्हार भगवतीपूर येथील भगवती माता मंदिरासमोरील भव्य प्रांगणात आगमन झाले. या प्रसंगी उपस्थित नागरिकांच्या जयजयकारात आणि भगवती मातेच्या साक्षीने रॅलीचे स्वागत करताना गावातील प्रत्येकाला अभिमानाचा क्षण अनुभवायला मिळाला.रॅलीच्या आगमनावेळी ग्रामपंचायत सरपंच दत्तात्रय राजभोज यांनी राजमाता अहिल्यादेवींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धा वंदना केली. भगवतीपूर गावच्या पवित्र भूमीत रॅलीचे आगमन होताच वातावरण भक्तिभावाने भारले गेले होते. ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणांच्या निनादात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

स्वराज महा रॅली ही १९ एप्रिल रोजी अहिल्यादेवींच्या जन्मभूमी चौंडी येथून सुरू झाली असून ती ३१ मे रोजी दिल्लीतील ताल कटोरा स्टेडियम येथे पोहोचणार आहे. तेथे लाखोंच्या उपस्थितीत राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती मोठ्या दिमाखात साजरी होणार आहे. महाराष्ट्रात घराघरात पोहोचलेल्या अहिल्यादेवींच्या कार्याचा जागर आता देशपातळीवर पोहोचावा, हा महादेव जानकर यांचा उद्देश असून त्यासाठी त्यांनी या ऐतिहासिक रॅलीचे आयोजन केले आहे.रॅलीचे कोल्हार भगवतीपूर येथे झालेल्या स्वागतप्रसंगी बोलताना रासपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते म्हणाले की, राजमाता अहिल्यादेवींच्या कार्याचा जागर संपूर्ण देशभर व्हावा म्हणून आम्ही एकत्र आलो आहोत. देशातील प्रत्येक घरात अहिल्यादेवींच्या आदर्शांची प्रेरणा पोहोचवणे, हेच आमचे ध्येय आहे. तर रासपच्या उत्तर महाराष्ट्र महिला अध्यक्षा सुवर्णाताई जऱ्हाड पाटील यांनी बोलताना सांगितले की, या महा रॅलीत सर्व जातीधर्माचे लोक एकत्र येत असून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडते आहे. ही केवळ रॅली नसून हा एक सामाजिक जागरणाचा प्रवास आहे.

या प्रसंगी श्री भगवती माता देवालय ट्रस्टचे उपाध्यक्ष साहेबराव दळे पाटील यांनी रॅलीतील प्रमुख मान्यवरांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार केला. रॅलीसाठी आलेल्या रासपच्या विविध जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे गावकऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. यावेळी देवालय ट्रस्टचे सचिव संपतराव कापसे, दिलीप बोरुडे, पत्रकार बंधू, व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या स्वागत सोहळ्यामुळे भगवतीपूर गावाचा इतिहासात नोंद होईल असा ठसा उमटला असून, रॅलीच्या माध्यमातून अहिल्यादेवींचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे काम रासपने नेटाने सुरू केले आहे.

## कुमारी कशिश रामटेके विद्यालयात प्रथम

# बल्लारपूर पब्लिक स्कूल मूल च्या शंभर टक्के निकालाची यशस्वी परंपरा कायम

**मुल । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेचा निकाल आज (१३ मे) जाहीर झाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही बल्लारपूर पब्लिक स्कूल, मूल या नामवंत शैक्षणिक संस्थेने आपली उज्ज्वल निकालाची परंपरा यशस्वीरित्या जपत सलग शंभर टक्के निकालाची कामगिरी कायम ठेवली आहे. या परीक्षेसाठी शाळेतील एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची साक्ष पुन्हा एकदा पटवून दिली. या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कुमारी कशिश छगन रामटेके हिने ९२.२० टक्के गुणांसह शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या यशामुळे संपूर्ण विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.तिच्यानंतर कुमार सम्यक जगदीश निमगडे याने ८९.०० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर तृतीय स्थानासाठी अंश मनोज तेलसे, निशांत सचिदानंद भेंडारे, आर्या महेंद्र मंडकवार या तिघांनी एकसमान ८३.८० टक्के गुण मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. कुमार ओंकार अरुण चिंचघरे यानेही ८०.६० टक्के गुणांसह उल्लेखनीय यश मिळवले.

या यशस्वी निकालाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ड. अनिलराव वैरागडे, सचिव शशिकांत धर्माधिकारी, शाळेचे प्राचार्य श्री. विनोद बोलीवार, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्तीर्ण व गुणवंत विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांचे हे यश हे त्यांच्या मेहनतीचे, पालकांच्या सहकार्याचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फळ आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.बल्लारपूर पब्लिक स्कूलने शिक्षणाच्या क्षेत्रात घडवलेले हे यश केवळ गुणांच्या आकड्यांपुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांमध्ये घडणाऱ्या मूल्याधिष्ठित शिक्षणाचा आणि परिश्रमाच्या संस्काराचा अभिमानास्पद परिणाम आहे.

# डोमा सांस्कृतिक विद्यालयाने राखली शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील डोमा येथील संस्कृती माध्यमिक विद्यालयाने २०१५ पासून एस एस सी परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली असून यावर्षीही शाळेचा शंभर टक्के निकाल लागला आहे. यामुळे पालक वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेच्या यशाला मुख्याध्यापक प्रदीप गारघाटे यांचे मोठे योगदान मानले जात आहे.



या संस्थेची स्थापना चिमूर तालुक्यातील माजी जिल्हा परिषद अध्यक्ष माननीय सतीश वारजुकर यांनी केली. डोमा गावातील शाळेची स्थापना करतांना शिक्षणाची कमी ओळखून आणि अति दुर्गम भागात असलेल्या गावांमध्ये शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. त्यामुळे डोमा गावातील ४००० लोकवस्तीला शिक्षणाच्या क्षेत्रात मोठा योगदान मिळाले आहे.अल्पावधीतच विद्यालयाची सुसज्ज इमारत उभी केली गेली असून शाळेमध्ये स्वातंत्र्य अध्यापक कक्ष, वर्गखोल्या, क्रीडांगन, प्रयोगशाळा, वाचनालय, सुस्वच्छ प्रसाधन गृह यासारख्या सुविधांचा समावेश आहे. याशिवाय शाळेमध्ये वृक्षरोपण आणि विविध उपक्रम सातत्याने राबवले जातात.सर्व विद्यार्थ्यांच्या यशाचा आदर्श म्हणून मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा स्पर्धेत या शाळेने सत्र २०२४-२५ मध्ये चिमूर तालुक्यात द्वितीय पारितोषिक प्राप्त करून गौरव मिळवला आहे.

मुख्याध्यापक प्रदीप गारघाटे, सहकारी शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मिळून हे यश मिळवले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश वारजुकर, गटशिक्षणाधिकारी कांबळे, विस्तार अधिकारी बोदाने, खांडेकर, महल्ले, केंद्रप्रमुख गायकवाड , तसेच विषय तज्ञ पंढरी , सोनवणे, बगडे, आत्राम, पवनीकर , गोंडाने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .